# देगलूर महाविद्यालयात राष्ट्रीय मतदार दिन

देगलूर : २५ जानेवारी १९५० रोजी भारतीय केंद्रीय निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक सूचनेनुसार ता.२५ जानेवारी हा दिवस राष्ट्रीय मतदार दिन म्हणून साजरा केला जातो. त्याचाच एक भाग म्हणून अडत व्यापारी शिक्षण संस्था संचलित देगलुर महाविद्यालयात अनेक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. राज्यशास्त्र विभागाच्या वतीने ता.२५ जानेवारी रोजी मतदार दिनाचे महत्व सांगणाऱ्या भित्ती पत्रकाचे प्रकाशन करण्यात आले. महाविद्यालयातील शिक्षक, कर्मचारी व विद्यार्थी यांनी मतदानाची शपथ घेतली. राष्ट्रीय मतदार दिनानिमित्त आयोजित केलेल्या या सर्व उपक्रमाच्या यशस्वितेसाठी राज्यशास्त्र विभागातील विभाग प्रमुख डॉ. आर.बी. लक्षटे व डॉ. चोले माधव, प्रा. ए.एस.देबडवार, प्रा. शिवानंद सुर्यवंशी, प्रा. मल्हारी सोनकांबळे यांनी परिश्रम घेतले.

Scanned with OKEN Scanner